बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३६३ । वार बुधवार दि २४ सप्टेंबर एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 363 wednesday 24 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# बीड जिल्हा हादरला! ओबीसी नेते लक्ष्मण हाकेंच्या विश्वासू कार्यकर्त्यावर प्राणघातक हल्ला!



सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

● संपादक :- दिपक थोरात मो.९८६०८९८५६४



## पवन करवर यांच्यावरचा हल्ला म्हणजे थेट लक्ष्मण हाकेंना गाठण्याचा डाव आहे; आंदोलनकर्त्यांमध्ये संताप उसळला?

### आरक्षणाच्या लढाईत आघाडीवर असलेल्या कार्यकर्त्यांवर असे हल्ले होत असतील तर, हा प्रयत्न आंदोलन मोडून काढण्याचा आहे का? जनतेतून सवाल?

### पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असला तरी, नेत्यांच्या सुरक्षेवर मोठा प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे?

**बीड (प्रतिनिधी):– जिल्ह्यात आरक्षण प्रश्न पेटलेला असतानाच माजलगाव तालुक्यातील सावरगाव परिसरात धक्कादायक घटना घडली आहे. ओबीसी आंदोलनाचे नेते लक्ष्मण हाके यांचे 'ढाल' ठरलेले विश्वासू सहकारी पवन करवर यांच्यावर तब्बल ४० ते ५० जणांच्या टोळक्याने प्राणघातक हल्ला केला. लाठ्या–काठ्या, दांडके, लाथाबुक्क्यांनी झालेल्या या अमानुष मारहाणीत करवर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांना माजलगावमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या तिघा साथीदारांनाही मार लागला असून उपचार सुरू आहेत.**

या घटनेमुळे संपूर्ण मराठवाड्यात खळबळ उडाली आहे. काही दिवसांपूर्वीच गेवराई तालुक्यात लक्ष्मण हाके यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न झाला होता, तेव्हा पवन करवर यांनी हाके यांचे प्राण वाचवले होते. आज त्यांच्यावरच असा हल्ला झाल्याने संतापाचा उद्रेक झाला आहे. या हल्ल्यामागे नेमके कोण आहेत? कोणत्या शक्ती पवन करवर आणि लक्ष्मण हाके यांना संपवण्याच्या कटात गुंतल्या आहेत? हा प्रश्न आता जिल्ह्याच्या राजकारणात आणि आंदोलनाच्या वातावरणात जोरदार चर्चेला आला आहे. पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असला तरी, नेत्यांच्या सुरक्षेवर मोठा प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे. आरक्षणाच्या लढाईत आघाडीवर असलेल्या कार्यकर्त्यांवर असे हल्ले होत असतील तर, हा प्रयत्न आंदोलन मोडून काढण्याचाच आहे का, असा सवाल जनतेतून विचारला जात आहे.

सविस्तर वृत्त असे मराठवाड्यातील वातावरण ढवळून निघालं असून काही ठिकाणी हिंसक घटना घडत आहेत. अशातच बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात खळबळ उडवणारी घटना घडली आहे. ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांचे अतिशय जवळचे व विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जाणारे केरवाडी पालम येथील रहिवासी पवन करवर यांच्यावर मंगळवारी रात्री सावरगाव परिसरात प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात पवन करवर हे गंभीर जखमी झाले असून त्यांचे इतर तीन साथीदार किरकोळ जखमी झाले आहेत. विशेष म्हणजे गेवराई तालुक्यात काही आठवड्यांपूर्वी जेव्हा लक्ष्मण हाके यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला होता तेव्हा पवन करवर हे हाके यांना वाचवण्याचा प्रयत्न करत होते. याच करवर यांच्यावर हल्ला झाल्याने हाके यांनी संताप व्यक्त केला आहे.


## शिक्षणाचं मंदिर की भक्षकाचं अड्डा? लक्ष्मण बेडसकर स्वतः च्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयातच महिलांवर लैंगिक अत्याचार करायचा?

**बीड (प्रतिनिधी):– शिक्षण क्षेत्राला मार्गदर्शन करणारा आणि रक्षण करणारा गटशिक्षणाधिकारीच जेव्हा भक्षक बनतो, तेव्हा समाजात भीषण संताप उसळतो. केज तालुक्यातील प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांचे दिवसेंदिवस अनेक धक्कादायक कारनामे उघडकीस होत आहेत. जिथे संपूर्ण तालुक्यातील शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते, शाळांच्या विकासासाठी योजना राबवल्या जातात, तिथेच गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी महिलांवर अत्याचार करून शिक्षण क्षेत्राची पवित्रता कलंकित केली आहे.**

### ● ऑफिसमध्ये या.. काहीही करायचं नाही, फक्त बोलू–बघू, पैसे देतो असे म्हणत महिलांना जाळ्यात अडकवणाऱ्या बेडसकरचे घाणेरडे अनेक कारनामे समोर?

### ● मुलींचा आणि महिलांचा सन्मान विकणारा गटशिक्षणाधिकारी बेडसकरच्या अश्लील संभाषणाच्या कॉल रेकॉर्डिंगने काळं कारस्थान केलं उघड?

स्वतःच्या कार्यालयातच महिला व मुलींवर अश्लील बोलणे केले, तसेच वरच्या मजल्यावर नेऊन अत्याचार अत्याचार करत होता असून, त्याचे एक संभाषण असलेले कॉल रेकॉर्डिंग सध्या व्हायरल झाले आहे. ऑफिसमध्ये या, कोणी नाही आज काहीही करायचं नाही फक्त बसू, बघू, बोलू आणि तुला पैसे देतो, असे शब्द ऐकून संपूर्ण जिल्हा हादरला आहे. गटशिक्षणाधिकारी म्हणजे शाळा, शिक्षक, विद्यार्थी यांच्यासाठी प्रेरणादायी पद परंतु या भक्षक अधिकाऱ्याने कार्यालयीन चारचौघातच अशा कृत्यांनी शिक्षण क्षेत्राला काळीमा फासला आहे. ज्या गटशिक्षणाधिकाऱ्याचे काम म्हणजे शिक्षकांना मार्गदर्शन करणे, आदर्श घालून देणे, त्याच अधिकाऱ्याने कार्यालयात अशा घाणेरड्या कृत्यांनी शिक्षण विभागाला नेमके कोणते धडे दिले? असा उपहासात्मक प्रश्न जनतेतून विचारला जात



आहे.

पालक, महिला शिक्षिका, खाजगी महिला तसेच विद्यार्थिनींच्या पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्याच्यावर आमचा विश्वास होता, तोच मुलींचा सन्मान हिरावून घेतोय, असा रोष सर्वत्र व्यक्त होत आहे. निष्पाप महिलांचा सन्मान, तसेच मुलींचे भविष्य उध्वस्त करणाऱ्या या नराधमाला फक्त निलंबन करून चालणार नाही तर तात्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी जोर धरत आहे. महिला आणि मुलींच्या सुरक्षेची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर आहे, तोच अधिकारी असा भक्षक निघाल्याने प्रशासनावर देखील गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. इतक्या तक्रारी आणि पुरावे समोर येऊनही अटक का होत नाही? आरोपीला संरक्षण देणारे कोण? या सर्व बाबींची उच्चस्तरीय चौकशी होऊन आरोपीला तात्काळ अटक करावी, अशी जनतेची एकमुखी मागणी आहे. लक्ष्मण बेडसकरच्या अनेक कारनामे उघडकीस येत असल्याने शिक्षण क्षेत्रातील स्वच्छतेचा मुखवटा फाडून टाकला आहे. आता या प्रकरणात फक्त निलंबन नको, तर तात्काळ अटक करून कठोर शिक्षा होऊनच महिलांना न्याय मिळावा, अशी जनआक्रोशाची ठाम भूमिका आहे.

## शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकार प्रयत्नशील–मंत्री पंकजा मुंडे

### धोंडराई गावात बैलगाडीने प्रवास करत नुकसानीची पाहणी

गेवराई (प्रतिनिधी) बीड राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी गेवराई तालुक्यात धोंडराई अमृता नदीच्या काठावर बैलगाडीने प्रवास करत मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे, आमदार विजयसिंह पंडित, सरपंच शितल साखरे शेताच्या बांधावर जावून नुकसानीची पाहणी केली. शासकीय मदत मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील आहे अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला. बीड जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीत अतोनात नुकसान झालेल्या गेवराई तालुक्यातील धोंडराई व हिरापूर तसेच परिसरातील शेताच्या बांधावर जावून पंकजाताई मुंडे यांनी दुपारी नुकसानीची पाहणी केली. पावसामुळे बाजरी, सोयाबीन, कापूस, उडीद आदी पिके पूर्ण जमीनदोस्त झाली आहेत. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनामार्फत मदतीसाठी आपण प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पाहणी करताना त्यांच्यासमवेत महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते . गेवराई तालुक्यातील धोंडराई व हिरापूर गावात मंत्री मुंडे यांनी जालना जिल्ह्याची अतिवृष्टीची पाहणी झाल्यानंतर बीड जिल्ह्यामध्ये प्रवेश केला असता गेवराई तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली. गेवराई तालुक्यातील धोंडराई येथे बैलगाडीने शेतांना भेट देऊन शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. या कठीण काळात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास त्यांना दिला.

याप्रसंगी आ.विजयसिंह पंडित , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, धोंडराई येथील सरपंच शितल साखरे तसेच इतर अधिकारी, कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.



## संपादकीय...

# भारतीय विद्यार्थ्यांच्या अमेरिकन ड्रीमची नौका बुडणार की काय?

अमेरिकेने नुकत्याच घेतलेल्या एका मोठ्या निर्णयामुळे संपूर्ण जगभरातील- विशेषत: भारतीय- विद्यार्थी, खढ व्यावसायिक आणि उद्योगक्षेत्रात चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानुसार, क-१इ व्हिसा अर्जासाठी आता एक लाख डॉलर्स म्हणजेच जवळपास ८८ लाख रुपये फी आकारली जाणार आहे. ही फी केवळ नवीन अर्जदारांसाठी असून, विद्यमानधारक किंवा नूतनीकरणसाठी नाही.

क-१इ हा अमेरिकेतील परदेशी कुशल कामगारांसाठी सर्वाधिक लोकप्रिय व्हिसा प्रकार आहे. भारतीय विद्यार्थी अमेरिकेत उच्चशिक्षणानंतर रोजगारासाठी हाच मार्ग निवडतात. अमेरिकन उद्योगांवर यामुळे दूरगामी परिणाम होणार आहेत. क-१इवर भरती केलेल्या प्रत्येक उमेदवारामागे अतिरिक्त खर्च करावा लागल्यामुळे आयटी कंपन्यांच्या नफ्याला कात्री लागेल. अमेरिकेत संगणकशास्त्र, डेटा सायन्स, -ख, सायबर सिक्युरिटी यांसारख्या क्षेत्रात स्थानिक कामगार अपुरे आहेत. भारतीय व इतर परदेशी तंत्रज्ञ कमी झाल्यास उद्योगांना आवश्यक कौशल्याची कमतरता भासेल. संशोधन व नवोन्मेषाची गती कमी होईल. कॅनडा, युरोप आणि भारतासारखे देश परदेशी टॅलेंट आकर्षित करतील.

आपल्या पारंपरिक 'मागा' मतदारांना आकर्षित करण्यासाठी ट्रम्प यांची ही राजकीय खेळी असली, तरी क१इ चा गैरवापर झालेला आहे यात शंकाच नाही! सतत विकसित होणाऱ्या -ख मुळे आता प्राथमिक स्तरावरची कामे करण्यास क१इ धारकांची गरज लागणार नाही, हेही खरेच! अमेरिकन काँग्रेसमध्ये रिपब्लिकन पक्षाचे मताधिक्य असल्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या परिप्रेक्ष्यात असणाऱ्या या कार्यकारी आदेशाला मंजुरी मिळण्याचे मिळण्याची शक्यता तिथे जास्त आहे. या प्रकरणाचा खटला अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात गेला, तर रिपब्लिकन न्यायमूर्तींची सहा-तीन अशी मेजॉरिटी असल्याने तिथेही वेगळा निर्णय लागण्याची शक्यता नाही. भारतासाठी ही एक मोठी संधी असू शकते.

योग्य धोरणे आखली तर या संकटाचे 'संधी'त रूपांतर करून भारताला 'ब्रेन ड्रेन'ऐवजी 'ब्रेन गेन' साधता येऊ शकते. अमेरिकेत संधी न मिळालेल्या तरुणांना भारतातच आकर्षक नोकऱ्या आणि संशोधन संधी मिळणे मात्र गरजेचे आहे. सरकार व खासगी क्षेत्राने अमेरिकेतून परतणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व्हेंचर कॅपिटल, इन्क्युबेशन सेंटर, जागतिक बाजारपेठेत प्रवेश या सुविधा द्याव्यात. खखढ, खखडल, खखच् यांसारख्या संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर आणण्यासाठी परदेशी प्राध्यापक, संशोधन अनुदान आणि जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम सुरू करणे आवश्यक आहे. कॅनडा, जपान, जर्मनी, फ्रान्स या देशांसोबत शैक्षणिक व रोजगार करार वाढवून विद्यार्थ्यांसाठी पर्याय उपलब्ध करून देता येऊ शकतील.

भारतीय विद्यार्थ्यांवर या निर्णयाचा होणारा मुख्य परिणाम म्हणजे करिअरची अनिश्चितता! भारतीय विद्यार्थी ऋ१ व्हिसावर अमेरिकेत जातात. शिक्षण संपल्यानंतर बारा महिन्यांसाठी ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग (जझढ) वर काम करू शकतात किंवा डढएच् मधले असतील तर तीन वर्षे काम करू शकतात. याच काळामध्ये क१इ व्हिसासाठी अर्ज करता येतो. या व्हिसाचा निर्णय आता लॉटरीऐवजी पगार आणि मेरिटवर ठरणार आहे. आजपर्यंत भारतीय विद्यार्थी अमेरिकेत शिक्षण घेतल्यानंतर क-१इ द्वारे नोकरी मिळवून तिथेच स्थायिक होत होते; पण नव्या फीमुळे कंपन्या परदेशी उमेदवारांना रोजगार देताना दोनदा विचार करतील.

भारतीय विद्यार्थ्यांसाठी ऋ१ व्हिसाला यावर्षी खूप दिरंगाईने मंजुरी मिळत होती; तसेच व्हिसा नाकारला जाण्याचे प्रकारही वाढले होते. शिवाय आता ओपीटीदरम्यान जास्ती कर भरायला लागणार आहेत. भारतीय विद्यार्थ्यांना ओपीटी मिळण्याच्या शक्यताच कमी झाल्या आहेत, कारण क१इ साठीचे वाढीव शुल्क. ऋ१, जझढ आणि क१इ अशा तीन बिंदूंच्या या बर्मुडा ट्रँगलमध्ये 'अमेरिकन ड्रीम'ची नौका बुडते का काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे!! मोठे शैक्षणिक कर्ज घेऊन अमेरिकेत गेलेल्यांच्या अडचणी अधिक गुंतागुंतीच्या होतील. आता भारतीय विद्यार्थ्यांनी अमेरिकेकडे डोळे लावून बसण्याची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. इतर देशांत करिअरच्या चांगल्या संधी आहेत. जपान जर्मनी इत्यादी देशांचा विचार होऊ शकतो. डेटा नालिटिक्स, क्वांटम कम्प्युटिंग, ब्लॉकचेन, सायबर सिक्युरिटी, ग्रीन टेक्नॉलॉजी या क्षेत्रांत जागतिक मागणी आहे. आज भारतात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आपली संशोधन केंद्रे स्थापन करत आहेत. चांगल्या पगाराच्या नोकऱ्या उपलब्ध होत आहेत. इंजिनिअरिंगच्या मुलांनी ऋ-ढए देऊन च.ढशलह. चा विचार करावा. मास्टर्स झाले की, पूर्ण शिष्यवृत्तीवर अमेरिकेतसुद्धा जाता येईल! मात्र, हवा बदलते आहे. शिक्षण कर्ज घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी इतर देशांतील खर्च, परतावा आणि नोकरीच्या संधींचा सखोल अभ्यास करून निर्णय घ्यावा. अमेरिकेने नुकत्याच घेतलेल्या एका मोठ्या निर्णयामुळे संपूर्ण जगभरातील- विशेषत: भारतीय- विद्यार्थी, खढ व्यावसायिक आणि उद्योगक्षेत्रात चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानुसार, क-१इ व्हिसा अर्जासाठी आता एक लाख डॉलर्स म्हणजेच जवळपास ८८ लाख रुपये फी आकारली जाणार आहे.

# बीड जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळ.!

## सत्यशोधक समाज स्थापना दिन विशेष

भारतीय इतिहासात मानवाला केंद्रबिंदू मानून अनेक लढे-आंदोलने उभी राहिली नि संपली सुद्धा.! परंतु या आंदोलनात सर्वाधिक काळ चाललेला प्रश्न होता तो स्वातंत्र्याचा. स्वातंत्र्य लढ्याला सुरुवात होण्याअगोदर भारतात क्रमाक्रमाने सामाजिक परिवर्तनासाठी विविध समाजातील लोक पुढे आले आणि आपल्यापरीने प्रबोधन करू लागले. यात प्रामुख्याने ज्यांचे नाव घेतले जाते ते राजाराम मोहन रॉय होत.! राजाराम मोहन यांच्यानंतर काळाला कलाटणी देणारा व काळाच्याही पुढे चार पावले टाकणारा, राजकीय स्वातंत्र्य मिळण्याआधी इथल्या हजारो वर्षाच्या विषमतेच्या शृंखलेत कितपत पडलेल्या बहुजनांना सामाजिक, धार्मिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळावे याकरिता युगचक्र प्रवर्तित करणारा युगपुरुष जोतीबा फुले नावाचा शुक्रतारा जन्मास आला, आणि आपल्या विद्वत्तासंपन्न बुद्धीसापेक्ष गुणांनी भारतात क्रांतीची लाट आणली. या क्रांतीच्या लाटेतून पुढे शाहू छत्रपती व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे तेजोगोल निर्माण झाले. महात्मा फुलेंनी आपल्या जीवाचे रान करून आणि सोसलेल्या अनंत यातनाच्या बलिदानातून पुण्यातील बाणेकरांच्या तालमीच्या दक्षिण बाजूतील चौकात तुकाराम नाईकांच्या दुमजली घरात, महात्मा जोतीराव फुले यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत, बुधवार दिनांक २४ सप्टेंबर १९७३ साली सत्य धर्माची स्थापना केली.!

तसे पहावयास गेलोत तर सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपूर्वी महाराष्ट्रात प्रागतिक विचारांचे चार समाज अधिच स्थापन झाले होते. यात परमहंस सभा, ज्ञानप्रसारक सभा, ब्राह्मो समाज आणि प्रार्थना समाज असे क्रमवार स्थापन झाले. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर पावणेदोन वर्षांनी आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी केली. या सर्व प्रागतीक समाजाचा चेहरा शहरी होता. तसेच यातील सर्व सदस्य हे नोकरीवाले किंवा व्यावसायिक होते. परंतु महात्मा जोतीराव फुले यांच्या समग्र विचारांचा परामर्श घेणारे काही सदगृहस्थांमुळे सत्यशोधक समाजाचे लोण शहरी न राहता खेडापाड्यात, वस्ती-तांड्यावर पसरले. यात आपला बीड जिल्हाही तसूभर कमी नव्हता.! कारण छत्रपती संभाजीनगर (तत्कालीन औरंगाबाद) मधील गंगापूर तालुक्यातील नेऊर गावचे ज्ञानगिरीबुवा जे महात्मा फुलेंचे सहकारी आणि सत्यशोधक समाज स्थापनेप्रसंगी उपस्थित असलेले एक बिनीचे सत्यशोधक होत. याच ज्ञानगिरीबुवांमुळे सत्यशोधकीय विचार मराठवाड्यात दाखल झाला. बुवांनी सर्वात प्रथम आपल्या मठात सत्यशोधक समाजाची शाखा उघडली. आपल्या कीर्तनातून महात्मा फुलेंचा समतेचा विचार ते सांगत. त्यांच्या अथक प्रयत्नांमधून मराठवाड्याच्या अनेक जिल्ह्यात तसेच तालुका व गावात सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापन झाल्या. यात प्रामुख्याने आपल्या बीडचा समावेश आहे. बीड जिल्ह्यात आष्टी, पाली, चौसाळा व खडकी आणि पारगाव आदी ठिकाणी सत्यशोधक चळवळ जोरात सुरू होती.!

१९२६ सालापासून आष्टी तालुक्यातील केरूळ या गावात मारुती विठोबा जगदाळे (केरूळकर) यांच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक चळवळ खळखळत होती. श्री जगदाळे यांचेवर अनेकवेळा हल्लेही झाले होते. गावातील कुळकर्ण्यांकडून त्यांचा आणि चळवळीत सहभागी झालेल्या सर्व समाज बांधवांचा छळ होत असे. पण कोणत्याही गोष्टीची तमा न बाळगता जगदाळेंनी समाजाचे काम नेटाने चालवले. याच तालुक्यातील रुई ज्याला पूर्वी रुईनालकोल असे म्हणत. या गावी परशुराम पाटील (नालकोल), यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर रुईनालकोल येथील पंचक्रोशीत सत्यशोधक चळवळ रुजवली. श्री पाटील हे प्राथमिक शिक्षण घेतलेले सुशिक्षित गृहस्थ होते ते मोडी भाषेत लेखन ही करीत असत. इतकेच नव्हे तर त्यांच्याकडे सुसज्ज असे सत्यशोधकीय ग्रंथालय होते. तसेच ते सत्यशोधक दीनमित्र या वृत्तपत्राचे वर्गणीदारही होते त्यांनी सन २८ नोव्हेंबर १९५८ मध्ये महात्मा फुलेंच्या स्मृतीदिनाचा कार्यक्रम घेतला होता. या कार्यक्रमासाठी त्यांनी तत्कालीन आष्टी नगर परिषदेचे नगराध्यक्ष सय्यद मीर आणि आष्टी येथील जलील अहमद साहेब टेलर यांना व्याख्याते म्हणून निमंत्रित केले होते. आपल्या बीड जिल्ह्यातील चौसाळा येथील धाराशिव-बीड जिल्ह्यातील घाटमाथ्यावर श्री गणपतराव आनंदराव शिंदे (नाईकवाडे) यांच्या पुढाकारातून सत्यशोधक जलसा ही चळवळ स्थापण्यात आली. श्री शिंदे हे इयत्ता पाचवी पर्यंत खाजगी शाळेत शिकलेले होते पुढे त्यांनी चौसाळा येथे एक शाळा स्थापन केली जिथे ते स्वतः मुलांना शिकवीत असत. मौजे ईट येथील बिनीचे सत्यशोधक किसनराव देशमुख यांच्यापासून प्रेरणा घेऊन त्यांनी सत्यशोधक जलसा उभा केला.! तसेच चौसाळा येथील ग्रामपुरोहिताला रद्दबातल केले. गणपतराव शिंदे यांच्यापासून प्रेरणा घेऊन त्यांचे चिरंजीव भास्करराव शिंदे आणि त्यांच्या सत्यशोधकी सहकार्यांनी आजपर्यंत या प्रागतीक विचारांच्या जलशाच संगोपन करून जतन केले आहे. तसे पहावयास गेलोत तर बीड जिल्ह्याला प्राचीन काळातील मौर्य, चौल, व सातवाहन आणि मध्ययुगातील निजाम, होळकर यांच्या राजसत्तेचा आणि राजवैभवाचा स्पर्श झाला आहे. अनेक संत- महंतांच्या दिव्यवाणीचा ओलावा मिळाला आहे. संत भगवान बाबांसारखे संत जन्मास येऊन समाजोद्धाराचे महान कार्य करून गेले आहेत. पण आज पर्यंत बीड जिल्ह्याला सत्यशोधकीय वारसा लाभला होता हे सत्य अंधारात होते. या सत्य इतिहासाला प्रकाशात आणण्याचे काम करून आम्हा संशोधकांना नवीचेतना देणाऱ्या, धडाडीचे सत्यशोधक दिवंगत जी. ए. उगले सर यांना सदरचा शोध निबंध विनम्रपणे मी अर्पण करतो.!

व सर्वांना सत्यशोधक समाज स्थापना दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.!

जय भिम. जय सत्यशोधक.



लेखक
आदर्शराजे विकासराव जोगदंड
( कार्याध्यक्ष :- तथागत प्रतिष्ठाण. बीड )

# सावध! केजमध्ये फेक फोन पे एस.एम.एस व कॉलद्वारे आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न

केज (प्रतिनिधी):- शहरातील अशोक विठ्ठल गायकवाड या व्यक्तीला अज्ञात नंबर वरून संशयास्पद कॉल आला. आणि सांगण्यात आले कि तुमच्या फोन पे वर २५०००/- रुपये पाठवले आहेत कारण माझा फोन पे नंबर ला पैसे जात नाहीत म्हणून तुमच्या नंबर वर टाकलेत आणि अशोक गायकवाड या व्यक्तीला २५०००/- रुपये आपल्या खात्यात जमा झाले आहेत. असा फोन पे वर आणि टेक्स्ट एस.एम.एस.आला.आलेल्या रकमेतून २,०००/-रुपये मला तात्काळ परत फोन-पेवर पाठवा,




अशी मागणी केली.मात्र, गायकवाड यांनी तत्काळ आपले खाते तपासले असता, कोणतीही रक्कम जमा झालेली नव्हती. एस.एम.एस. पूर्णपणे फेक असल्याचे स्पष्ट झाले.आश्चर्याची गोष्ट मात्र दोन्ही व्यक्ती एकमेकांना ओळखत न्हवते.त्यामुळे फसवणुकीचा हा प्रयत्न अपयशी ठरला. या प्रकारामुळे नागरिकांना पुन्हा एकदा सावध राहण्याचा इशारा मिळाला आहे. अज्ञात नंबरवरून आलेले फोन किंवा एस.एम.एस. वर विश्वास ठेवू नये, तसेच कोणत्याही प्रकारचे व्यवहार करण्यापूर्वी स्वतःचे बँक खाते तपासून खात्री करून घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.खोटे एस.एम.एस.आणि कॉलद्वारे आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार वाढत आहेत. अशा संदेशांवर विश्वास ठेवून पैसे पाठवू नयेत. त्वरित बँक व पोलिसांना माहिती द्यावी.

पान ४ वरून..

### धनंजय मुंडे धावले पूरग्रस्तच्या मदतीला

खंबीरपणे उभा राहून १००%नुस्कान भरपाई दिली जावी. यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. नदीकाठच्या गावामध्ये नागरिकांनी अधिक सतर्क राहुल काळजी घ्यावी तसेच कोणतेही आपत्कालीन तो उभा निसर्ग कोपतो तेव्हा मानवी मर्यादा उघड्या आणि त्याच वेळेस संवेदना देखील सिद्ध होतात. धनंजय मुंडे यांना कर्जतच्या कार्यक्रम झाल्यावर डॉक्टर विजिट होती. मात्र पावसाच्या जोर वाढला गाव जल वेढानेने गिळकतं होतात की काय अशा शिस्तीत गाडी परळी दाखल झाली. ओला दुष्काळ जाहीर व्हावा ही सर्व आधी मागणी आहे जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी लोकांच्या सोबत आहेत. आपत्ती मंत्री म्हणून नामदार गिरीश महाजन गेवराई तालुक्यात आहेत. उपमुख्यमंत्री अजित दादा दोन जिल्ह्यांच्या दौऱ्यावर येत आहेत. बीडच्या माणुसकीला देणाऱ्या या महापुराला आम्ही परास्त निरस्त नकी करु रात्री धनंजय मुंडे यांनी परळी शहर व आज दिवसभर परळी अंबाजोगाई ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या सोबत वेदना वाटून घेतल्या. सरकार दरबारी सगळं मुस्कान पहोच झाले आहे. येणाऱ्या काळात अस्मानी च्या गोपाला सुलतानी मलम लावेल. शेती आणि शेतकऱ्यांसाठी उभा राहून एकत्र. एका शेतकऱ्यांनी केविळ आवाजात सागितली शेतीची वाणी

सतत च्या पावसामुळे व नदीला आलेल्या पुरामुळे माझे नदीकाठी असलेल्या १५ एकर शेतातील कापूस सोयाबीन हि पिके तर जमिनदोस्त झाली.आहेतच पण शेत जमिन अक्षरश वाहुन गेली आहे.१५ एकरसाठी झालेला खर्च हा लाखोंच्या घरात असुन उत्पन्न सुन्न आहे.पण रब्बी हंगामातील पीक घेण्यासाठी शेत तयार करण्यासाठी पण खूप खर्च येणार आहे. आणि अशी विदारक सत्य परिस्थिती असूनही पोहनेर शिवारातील शेतीचा पंचनामा करण्यासाठी प्रशासनाचा एक पण प्रतिनिधी आलेला नाही, तरी सरकारने प्रति हेक्टर शेतकऱ्याला ५० हजाराचा निधी उपलब्ध करून द्यावा व सरसकट शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात यावे यासाठी हीच वेळ सरकार वर शेतकऱ्याला सावण्यासाठी आली आहे, माझी कृषिमंत्री व परळी विधानसभाचे विधाते आमदार धनंजय मुंडे साहेब, व त्यांच्यासोबत परळी तहसीलचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे साहेब,सिरसाळा पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक दबंग एपीआय श्री गोरखनाथ दहिफळे साहेब व मार्केट कमिटीचे संचालक राजेभाऊ चाचा पौळ, लक्ष्मण तात्या पौळ, पवनेरचे सरपंच उपसरपंच सिरसाळ्याचे माजी सरपंच रामदादा किरवले, व सोबत दैनिक आरंभ परळी तालुका प्रतिनिधी बापू किरवले यांच्यासह शेतकरी बांधव व गावकरी मंडळी यावेळी उपस्थित होते ,

------------------

### डॉ योगेश क्षिरसाग सारीका क्षीरसागर

क्यता असून ते प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. तातडीने मदत जाहीर करण्यासंदर्भात ते निर्णय घेतील, अशी माहिती डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांशी बोलताना दिली. त्यांनी पुढे म्हटले की, पूरस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळावी यासाठी सरकार हालचाल करत आहे. ऑगस्टमधील नुकसानीसाठी ५६ कोटी रुपयांचे अनुदान जिल्ह्याला मिळाले आहे. सप्टेंबरमधील पंचनामे पूर्ण होताच मदत दिली जाणार आहे, असेही डॉ.क्षीरसागर म्हणाले.

डॉ.सारिका क्षीरसागर यांची बीड, शिरूर कासार तालुक्यातील गावांमध्ये पाहणी

डॉ.सारिका क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील राजुरी, बहादरपूर, साक्षाळपिंपरी तसेच शिरूर कासार तालुक्यातील कमलेश्वर धानोरा आदी गावांमध्ये नुकसानग्रस्त शेती, रस्त्यांची पाहणी केली. दरम्यान, आज (दि. २४) त्या गात शिरापूर, हाजीपुर, गाजीपूर, आर्वी, फुलसांगवी व मार्कडवाडी या गावांना भेट देणार आहेत.

'कल्पतरू'चा दांडिया कार्यक्रम पुढे ढकलला

जिल्ह्यातील सलग पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असल्याने बीड शहरातील 'कल्पतरू' आयोजित 'नवजलसा दांडिया' कार्यक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा कार्यक्रम २५ सप्टेंबर रोजी होणार होता. नवीन तारीख लवकरच जाहीर केली जाईल, अशी माहिती सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांनी दिली.

------------------

### खा.बजरंग सोनवणे पुरग्रस्तांच्या भेटीला

दिवसांपासून शेतात पाणी असल्याने पिके पिवळी पडत आहेत.शिवाय पुरामुळे शेती खरडून गेली असून आता पुन्हा शेतकऱ्यांनी शेती करायची कशी असा प्रश्न आहे.मंगळवारी खा.बजरंग सोनवणे हे दिल्लीवरून शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी परतले. यानंतर त्यांनी केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील विविध गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी नुकसान ग्रस्त शेतकरी,आणि ग्रामस्थांशी संवाद साधला.कोणतीही अडचण वाटली तर संपर्क करा,तुम्हाला शासनस्तरावर मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू, वेळप्रसंगी शासनाला भांडू परंतु मदत मिळवून देऊ,असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.

आज पाटोदा,शिरूर बीड दौरा

खा.बजरंग सोनवणे हे आज पाटोदा,शिरूर आणि बीड तालुक्यातून वाहणाऱ्या मोठ्या नद्या मुळे झालेल्या नुकसानी ची पाहणी करणार आहेत.पाटोदा,शिरूर शहरात पाणी शिरूर त्याठिकाणी व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान झाले होते. त्याठिकाणी देखील ते भेटी देणार आहेत.तर बीड तालुक्यात सिंदफणामुळे जिथे नुकसान झाले आहेत, अशा ठिकाणी शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

--------------------

### पूरग्रस्तांच्या मदतीला धावून स्वतःचा

प्रत्येक माणूस सुखरुप आहे का याची खात्री करत होती. एक पोलीस अधिकारी असतांना देखील एखाद्या पोलीस कर्मचाऱ्यां सारखं त्या ठिकाणी गोरखनाथ दहिफळे राबत होते. लोकांना सुखरुप या काठावरून त्या काठावर घेऊन जातांना जिवाची परवा केली नाही. जनतेच्या रक्षणासाठी असलेल्या खाकीची साक्ष तर दिलीच परंतु खाकीतल्या माणसाची माणूसकी चे दर्शन देखील दिसुन होत आहे. सपोनि गोरकनाथ दहिफळे साहेब तुमच्या कार्याला सलाम , ह्या गोदाकाठचा माणूस तुम्हाला तुमच्या कार्याला कायम स्मरणात

--------------------

### शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची तात्काळ

घालवू नये, तर तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा.

'आश्वासन नव्हे, प्रत्यक्ष कृती हवी'

बाजीराव ढाकणे यांनी पुढे सांगितले, शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पाहा. केवळ आश्वासनांनी पोट भरत नाही. बीड जिल्ह्यातील सर्व तालुके ओला दुष्काळग्रस्त घोषित करून हेक्टरी १ लाख रुपयांची मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली पाहिजे. दौरे व बैठकींपेक्षा प्रत्यक्ष कृती होणे आवश्यक आहे.

पूरस्थितीमुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता

बीड जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतजमिनी जलमय झाल्या असून पिकांचे झालेले नुकसान आणि आर्थिक संकटामुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत. अशा वेळी शासनाने तात्काळ उपाययोजना न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होईल, असे मत श्री बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

शेतकऱ्यांचा सरकारला इशारा

जर तात्काळ मदत मिळाली नाही, तर शेतकऱ्यांचा रोष रस्त्यावर येईल, असा स्पष्ट इशारा श्री. बाजीराव ढाकणे यांनी सरकारला दिला आहे. शेतकऱ्यांचा आवाज आता रस्त्यावरूनच सरकारपर्यंत पोहोचवावा लागेल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले आहे

--------------------

### जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करू

त्यामुळेअतोनात नुकसान झाले आहे. अनेक गावात पाणी शिरले असुन जनावरांचे गोठे वाहुन गेले असून पशुधनाची देखील जिवीत हानी झाली आहे.त्यामुळे आपण सबंध जिल्हा ओला दुष्काळ म्हणून जाहिर करावा व ज्याची घरे, जनावरे वाहुन गेली त्यांना वेगळी वेगळी मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे.अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीमुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे. करिता शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळाली पाहिजे थेट मुख्यमंत्र्यांकडे त्यांनी याबाबत मागणी करून संवाद साधला आहे.

पुढे बोलताना खा. पाटील म्हणाल्या की, शासनाने तत्परतेने कार्यवाही केली नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल.त्यामुळे प्रशासनाने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या विविध योजनांमधून तसेच आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मदत देण्यात यावी,अशी मागणी त्यांनी केली.

शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार खा.रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळे पर्यंत पाठपुरावा करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

--------------------

### जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा

मदत जाहीर करावी, अशी सर्वसामान्य शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. गेल्या काही दिवसांत

झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील शेकडो गावांतील शेतकरी हवालदिल झाले आहेत. काही ठिकाणी घरांची पडझड तर काही भागात शेतजमिनी वाहून गेल्याची उदाहरणे दिसून येत आहेत. शेतकऱ्यांचे कर्जफेडीचे संकट अधिकच गहिरे झाले असून आगामी रब्बी हंगामासाठी पेरणी करण्याची देखील भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांनी सरकारला विनंती केली आहे की, जिल्ह्यातील नुकसानीचे पंचनामे तात्काळ पूर्ण करून शेतकऱ्यांना थेट मदत पोहोचवावी. केवळ निवडक शेतकऱ्यांनाच मदत देण्यापेक्षा सर्वसामान्य शेतकरी बांधवांपर्यंत मदत पोहोचली पाहिजे अशी मागणी करुन सरपंच अंकुश शेळके यांनी शेतकऱ्यांच्या या मागणीला आता सरकारने पाठबळ द्यावं. शासनाने तातडीने ओला दुष्काळ घोषित करून मदत कार्यवाही सुरु करावी, अशी मागणी केली आहे.

--------------------

### ओला दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी ५०

आलेले सोयबीन पीक पाणी साचल्याने जाग्यावर सडले असून पूर्णपणे हे पीक हातातून गेले आहे तर कापुस पिकांचे बोंडे,पाते गळून पडली असून कांदा जाग्यावर सडला आहे.त्याच बरोबर बाजरी,उडीद, मुग ही पिके हीहातातून गेले असून ऊस पिकांच्या सऱ्यामध्ये पाणी साचले असून मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. भाजीपाल्याचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.सध्याच्या परिस्थितीत पाऊस थांबण्याचे नाव घेत नसून नद्या पाण्याने भरल्याने आता पात्र सोडून वाहत आहेत. तालुक्यातील प्रत्येक गाव अतिवृष्टीने बाधित झाले असून शासनाने कुठल्याही प्रकारचे पंचनामे न करता तात्काळ सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची अर्थिक मदत देण्यात यावी. तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून ओल्या दुष्काळातील सर्व प्रकारच्या मदती शेतकऱ्यांना देण्यात याव्यात.अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) जेष्ठ नेते रमेश आडसकर यांनी तहसीलदारांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी बाजार समितीचे सभापती अंकुश इंगळे,माजी उपसभापती ऋषीकेश आडसकर,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अमर पाटील,शहराध्यक्ष अजहर इनामदारयांच्या सह तालुक्यातील माजी जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य,सरपंच,उप सरपंच,सदस्य,सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन,पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येनेउपस्थित होते.

--------------------

### जिल्हा ओला दुष्काळ घोषित करून

तालुक्यात ५, परळी आणि धारूर तालुक्यात प्रत्येकी १ व्यक्तीचा समावेश आहे. सुदैवाने जखमींची कोणतीही नोंद नाही. याशिवाय, १३१ जनावरे दगावली तर घरांच्या नुकसानीत १८ पक्की घरे, १५९ कच्ची घरे, ५ झोपड्या आणि जनावरांचे १० गोठे उद्ध्वस्त झाले आहेत. पावसामुळे झालेल्या नुकसानाचा संपूर्ण अहवाल लक्षात घेऊन लागलीच आपण बीडकरांच्या पुनर्वसनासाठी ठोस पाऊले उचलणार असल्याचे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांनी सांगितले आहे.

--------------------

### स्वातंत्र्यानंतरही मूलभूत सुविधांपासून वंचित

येत नाही,विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित झाले,दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाले,तहसीलदारांना थेट पाण्यात उतरवले या संतापातून गावकऱ्यांनी वाहत्या पाण्यात उतरून आंदोलन छेडले. परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या तहसीलदारांना ग्रामस्थांनी थेट पाण्यात उतरवून आपला रोष व्यक्त केला. या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते प्रकाश उजगरे यांनी जाहीर पाठिंबा दिला.ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्या तातडीने मान्य करून रस्ता व पुलाचे काम सुरू झाले पाहिजे, अन्यथा आमचा संघर्ष अधिक तीव्र होईल, असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी उपस्थित कोठारबन गावातील सरपंच, तसेच गावातील शाळकरी मुले,महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------------

-

# धनगर समाजाच्या जालना येथील आरक्षण मोर्चासाठी लिंबागणेशकर रवाना

## लिंबागणेश ग्रामपंचायतीचा ठराव, सकल मराठा समाजाचा ठाम पाठिंबा : डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश (प्रतिनिधी):- जालना येथे धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बोहाडे यांच्या नेतृत्वात गेल्या आठ दिवसांपासून धनगर समाजाला एसटी आरक्षण अंमलबजावणी करण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू आहे. या आंदोलनाला सकल मराठा समाजासह विविध संघटनांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे.

सध्या धनगर समाज इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गात असून त्यांना भटक्या जमाती (एनटी-सी) अंतर्गत ३.५ टक्के आरक्षणाचा लाभ आहे. मात्र धनगर बांधवांची ठाम मागणी आहे की त्यांना थेट एसटी प्रवर्गात सामावून घ्यावे, कारण त्यांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीनुसार हे आरक्षण अधिक न्याय्य ठरते.

आज दि.२४ रोजी जालन्यात होणाऱ्या धनगर समाजाच्या ईशारा मोर्चासाठी लिंबागणेश व पंचक्रोशीतील धनगर व मराठा बांधव मोठ्या संख्येने रवाना झाले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चौकातील प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून घोषणाबाजीच्या गजरात हा मोर्चा लिंबागणेशकरांनी प्रारंभ केला.

यावेळी राजेभाऊ गिरे,अनंतकाका मुळे,बाळासाहेब मुळे, गणपत तागड, कृष्णा पितळे, शहादेव धलपे, बाळु मुळे, रामदास मुळे, महादेव मुळे, गोवर्धन गिरे, नवनाथ मुळे कोकाटे दाजी,बंकट लगास,आबा राहिंज आदी बांधव उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

ग्रामपंचायतीचा पाठिंब्याचा ठराव

धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी लिंबागणेश ग्रामपंचायत एकमुखाने ठराव घेऊन या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे. हा ठराव आजच नेते दिपकभाऊ बोहाडे यांना सुपूर्द करण्यात येणार असल्याची माहिती सरपंच बाळासाहेब जाधव यांनी दिली.

सकल मराठा समाजाचा पाठिंबा

धनगर समाजाला न्याय मिळावा यासाठी सकल मराठा समाज ठामपणे पाठीशी आहे. आरक्षण अंमलबजावणी ही काळाची गरज आहे, अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.




*आष्टी तालुक्यातील वेलतुरी तलावाच्या सांडव्याला पडले भगदाड!*

# वेळीच उपाययोजना न झाल्यास धोका होण्याची शक्यता



दौलावडगाव (प्रतिनिधी):- पाच,सहा गावांसह परिसरातील शेतीबाडी ओलिताखाली यावी म्हणून उभारलेला वेलतुरी येथील तलावाच्या सांडव्यांचे मोठ मोठे दगड निखळले असून भगदाड पडले आहे.याची दुरूस्ती न झाल्यास धोका निर्माण होऊ शकतो.अशी अवस्था झाली असून या तलावाच्या सांडव्याची दुरूस्ती करावी अशी मागणी संजय जपकर यांनी केली आहे.

आष्टी तालुक्यातील वेलतुरी येथे असलेला तलाव हा अनेक वर्षापुर्वीचा आहे.सावरगांव, शेंडगेवाडी, शेडाळा, या गावातील नदीवरून उगम आहे. नुकत्याच झालेल्या पावसाने व वाढलेल्या पाण्याने सांडव्याचे दगडं निखळले असून याकडे वेळीच लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात दुर्लक्ष झाल्यास वेलतुरी येथील तलावाचा सांडव्याला पडलेले भगदाड फुटण्याच्या मार्गावर आहे. जर दुर्दैवी घटना घडली तर गौखेल, उंदरखेल, हिवरा,पिंपरखेड, सुलेमान देवळा या गावांना धोका पोहचू शकतो.त्यामुळे लघुपाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून त्वरीत दुरुस्ती करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय जपकर यांनी केली आहे. याबाबत आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील यांना विचारणा केली असता त्या म्हणाल्या की असा प्रकार असेल तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी बोलून तात्काळ उपाययोजना राबविण्याचे सांगण्यात येईल असे त्यांनी बोलतांना सांगितले.

# बीड तालुक्यातील माळापुरी येथील सोयाबीन मूग बाजरी कापूस पिकाचे नुकसान

## सरसकट नुकसान भरपाई पाहिजे समीर बेग उपसरपंच

बीड (प्रतिनिधी):- तालुक्यातील माळापुरी शिवारामध्ये शेतकऱ्याचे अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अतिवृष्टीच्या पावसामुळे नदीकाठीच्या सर्व जमिनी पिकासहित वाहून गेल्या यामध्ये कापूस सोयाबीन बाजरी मुंग या पिकाचे खूप नुकसान झालेले आहे. माळापुरी चे उपसरपंच यांना माहिती मिळताच त्यांनी शेतामध्ये जाऊन पाणी केली व कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके साहेब यांना माहिती देऊन तत्काळ मंडळ अधिकारी कृषी सहाय्यक तलाठी ग्रामसेवक यांना



घेऊन नुकसान झालेल्या पिकाची पाहणी केली व शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानाची अधिकाऱ्यासमोर व्यथा मांडली सतततच्या सुरू असलेल्या पावसाने कापूस सोयाबीन मुंग बाजरी या पिकाचे नुकसान झालेले आहे . यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई लवकर मिळावी यासाठी तहसीलदार साहेब यांना आवाहन केले. यावेळी उपस्थित सरपंच सरपंच ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी राजा उपस्थित होते.

# शाहूनगर मध्ये श्री महालक्ष्मी मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन!

बीड (प्रतिनिधी)- शहरातील शाहूनगर भागातील पोल फॅक्टरीच्या पाठीमागे असलेल्या महालक्ष्मी कॉलनीमध्ये लोकसहभागातून उभारण्यात आलेल्या श्री महालक्ष्मी मंदिरात आज थोर संत महंतांच्या शुभहस्ते श्री महालक्ष्मी मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यास बीड शहरातील भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन महालक्ष्मी कॉलनीतील नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की बीड शहरातील शाहूनगर भागातील पोल फॅक्टरीच्या पाठीमागे असलेल्या महालक्ष्मी कॉलनी मध्ये लोकसहभागातून कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे अधिष्ठान मांडून मातेचे मंदिर बांधण्यात आले. या



मंदिरातील मूर्ती प्रतिष्ठान व कलश रोहण सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमांमध्ये पहिल्या दिवशी म्हणजेच मित्ती आश्विन शुक्ल पक्ष १ सोमवार दि. २२ सप्टेंबर रोजी सकाळी १०:०० वा. शोभायात्रा काढून सकाळी ११:३० मी. पुजेला प्रारंभ करण्यात आला. गणेश पुजन, स्वस्ती पुण्याहवाचन, मातृका पुजन, नांदीश्राध्द, ऋत्विक वरणम, जलाधिवास, अग्नीस्थापना, देवता स्थापना, ग्रह होम, सायं पुजन, आरती कार्यक्रम संपन्न झाला. दुसऱ्या दिवशी

मित्ती आश्विन शुक्ल पक्ष २ मंगळवार दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी १०:०० वा. शोभायात्रा काढण्यात आली. त्यानंतर सकाळी १०:०० मी. स्थापित देवता पुजन (प्रसाद वास्तुशांती) ८१ कलश शिखर स्थापन/प्रसादोत्सर्ग मुर्ती मुर्तीपति लोकपाल हवन, प्रधान देवता हवन, मुर्ती स्थापन, विधी, मुर्ती न्याय विधी कर्मशिला, ब्रम्हशिला, पिण्डिका वाहन पुजन, शय्यदिवास व धान्यादीवास, सायं. पुजना नंतर आरती संपन्न झाली. आज तिसऱ्या दिवशी मित्ती आश्विन शुक्ल पक्ष ३, म्हणजेच बुधवार दि. २४ सप्टेंबर रोजी प्रातः पुजन, प्रासाद दिक्षु होम कार्यक्रमानंतर सकाळी ११ वाजता श्री.ह.भ.प.प.पू.गुरू. शांतीब्रम्ह नवनाथ महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी, श्री.ह.भ.प.प.पू.गुरू. महादेव महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी, श्री.ह.भ.प.प.पू. गुरू. महंत शिवाजी महाराज मठाधिपती, श्रीक्षेत्र नारायणगड श्री.ह.भ.प.प.पू.गुरू. श्रीहरी पवार महाराज श्री क्षेत्र दत्त संस्थान कोल्हारवाडी यांच्या शुभहस्ते कलशारोहन व महालक्ष्मी मातेची प्राणप्रतिष्ठा होईल.

# कर्तव्य आणि माणुसकीचे नाते;अंभोरा पोलीस ठाण्याचा उपक्रम

दौलावडगाव (प्रतिनिधी):- अतिवृष्टीमुळे अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीतील अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले असून अनेक नागरिक उघड्यावर आले आहेत. या कठीण प्रसंगी केवळ कायदा-सुव्यवस्था राखणे एवढेच नव्हे तर नागरिकांना मानसिक आधार देणेही पोलिसांचे कर्तव्य असल्याचे दाखवून देत अंभोरा पोलीस ठाण्याच्या वतीने गरजू कुटुंबांना फुल ना फुलांची पाकळी म्हणून रविवारी किराणा किट वाटप करण्यात आले.

अंभोरा पोलिसांचा हा उपक्रम म्हणजे मोठी मदत नव्हे, तर दुःखात थोडासा हातभार आणि संकटात आधाराचा हात आहे. यामुळे नागरिकांना आपण एकटे नाही असा विश्वास मिळाला असून समाजात परस्पर सहाय्याची प्रेरणा देणारा हा उपक्रम ठरत आहे.ठाणे हद्दीतील गरजुवंत लोकांपर्यंत याचा लाभ



मिळाल्याने अनेकांच्या चेहर्यावर आनंद दिसून आला.यावेळी अंभोरा ठाण्याचे कर्तव्यदक्ष सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे,पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे,आदिनाथ भडके,देवीदास सातव,सरपंच प्रल्हाद मुळीक, पत्रकार अंकुश तळेकर, राजेंद्र तळेकर, सदाशिव घुमरे,सचिन गडकर, पोलीस कर्मचारी,याच्यासह अनेकजण उपस्थित होते. वर्दीतील दर्दी माणूस

पोलीस अधिकारी येतात आणि जातात.पण काही अधिकारी लोकांच्या मनात घर करून ठेवतात.पोलीस अधिकारी म्हणून नव्हे तर एक कुटुंब म्हणून प्रत्येक व्यक्तीकडे पाहून सदैव सेवेत उभा राहत.सरकारी कामा सोबत शोषित, वंचित, पिडीत,बेघर, व गरजू लोकांची सेवा करत माणुसकी घडवणारे वर्दीतील दर्दी माणूस म्हणून साळवे यांच्याकडे पाहिले जाते.

# धारूर येथे भाजपच्या वतीने पंधरवाडा सेवा अंतर्गत सुजान लॉन्स येथे रक्तदान शिबिर संपन्न



धारूर (प्रतिनिधी):- धारूर येथे भाजपाच्या वतीने सेवा पंधरवाडा अंतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्र भाई मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी धारूरच्या वतीने सेवा पंधरवडा अंतर्गत सुजाण लॉन येथे भव्य रक्तदान शिबीर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या ४४ रक्ततदात्यांनी रक्तदान केले तसेच कार्यक्रम मध्ये बोलताना भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरध्यक्ष डॉ स्वरूपसिंह हजारी यांनी बोलताना सांगितले कि रक्तदान केले पाहिजे कारण एखादा गरजूवान रुग्णांना रक्ताची गरज भासते व आयुष्यात नवीन जीवनदान मिळते तसेच जी. येस. टी. मुळे व्यापारी असेल व सर्व सामान्य माणसाला याचा फायदा होणार आहे तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांनी तळागळातील लोकांपासून ते सर्व सामान्यपर्यत विकास कामाचा माध्यमातून हायवे रोड असतील अशे अनेक कामे मोदी साहेब यांच्या माध्यमातून विकास कामे केली तसेच मिशन सिंदूर कलम ३७० सारखे मोठे निर्णय मोदी साहेब यांनी घेतले या विषयी माहिती डॉ.स्वरूपसिंह हजारी यांनी सविस्तर अशी माहिती दिली.

या वेळी भारतीय जनता पार्टी चे प्रदेश कार्यकारणी सदसय तथा नगरध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी ,माजी नगरध्यक्ष उत्तमभाऊ तोषनिवाल, जेष्ठ उदयसिंह दिखखत काका, मनोहर मामा तिवारी, रामदास काका गायकवाड, गटनेते रोहित हजारी, नगरसेवक संतोष बाप्पा सिरसट,बाळासाहेब खामकर, बालू दादा चव्हाण,सचिन दुबे ,रुपेश चिद्रवार, सुरेश लोकरे, एजाज भाई, अशोकराव करे, ऍड.बालासाहेब चोले, माणिकराव लोखंडे ,संदीप काचगुडे, दत्ताभाऊ धोत्रे , बाबुभाई मिस्त्री, ऍड.मोहन भोसले , रोहनसिंह हजारी, गोविंद तोंडे, रामप्रभु मुंडे, दादासाहेब घोळवे ,सुरेंद्र तोंडे ,संतोषजी सदिवाल, सर्व मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.



**बीड : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नियोजन करून दिलेल्या नवरात्र उत्सवात सन्मान नवदुर्गाचा नऊ दिवसीय कार्यक्रम निमित्त दिनांक २३/०९/२०२५ दुसरा दिवस आयोजक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला जिल्हा सचिव अनुराधा प्रकाश यांनी बीड येथील काही दिव्यांग महिलाना सन्मान पत्र देवून सन्मानित केले त्या प्रसंगी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला जिल्हअध्यक्ष प्रज्ञा ताई खोसरे , कार्याध्यक्ष शालिनी ताई परदेशी, नंदिनी ताई, कोमल ताई या सर्व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.**

*शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ संभाजी ब्रिगेड मैदानात*

# ओला दुष्काळ जाहीर करून हेक्टरी लाख रुपये द्या ; तहसीलला दिले निवेदन

धारूर (प्रतिनिधी):- कसल्याही कागदपत्राची अट न घालता तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून हेक्टरी एक लाख अनुदान देण्यात यावे संभाजी ब्रिगेड ची मागणी धारूर तहसीलदार दिले निवेदन आसमानी संकटाने शेतकऱ्याला पूर्णतःहा उध्वस्त केले असून आलेले पीक गेल्या आठ दिवसापासून पाण्यात बुडलेले दिसते तरीही शासन प्रशासन गांभीर्याने घेताना दिसत नाही. मुख्यमंत्री म्हणतात एनडीआरएफ च्या नियमानुसार अनुदान रक्कम रक्कम मिळेल मुळात हा नियम अतिवृष्टीला लागू होतो का हा ही प्रश्न समोर येतोय शेतकरी राजा फक्त बोलण्यापुरताच का पोशिंद्याला पोसायची वेळ आली की सरकार होते निवडणुकांच्या वेळी कर्जमाफीचे दिलेला आश्वासन कधी पूर्ण करणार काही प्रश्न सातत्याने पुढे येतात शेतीला उद्योगाचा दर्जा देण्यात यावा स्वामीनाथन आयोग लागू करण्यात यावा ही अनेक वर्षापासून ची संभाजी ब्रिगेडची मागणी कधी पूर्ण करणार अनेक प्रश्न निवेदनात देण्यात आलेले आहेत. यावेळी संभाजी



ब्रिगेड बीड जिल्हा अध्यक्ष देशमुख तालुकाध्यक्ष राजेंद्र मोरे शहरध्यक्ष प्रताप तीबोले, योगेश्वर अंबाड ,जनक फुन्ने,पवन निकते, शुभम निकते, सुनील सुरनर, ऋशी फरताडे, अमरदीप तिबोले, आदिनाथ गोतावळे, सुरज तिबोले, सिद्धांत तिबोले,अजित पवार, निलेश शिनगारे आधी संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी होते.

*नऊरात्री चे नऊ रंग*

*नवदुर्गा आजचा रंग*

**निळा रंग शांतता, स्थिरता आणि विश्वासाचे प्रतीक मानला जातो.**

**हा रंग भक्तांना आत्मविश्वास, धैर्य आणि मानसिक शांती प्रदान करतो.**

**निळा रंग आकाश व समुद्राप्रमाणे अनंत शक्यता दर्शवतो.**

**नवरात्रीत हा रंग धारण केल्याने सकारात्मक ऊर्जा आणि अध्यात्मिक शक्ती वाढते.**

**डॉ. राधा सचिन तांबे**
**आंतरराष्ट्रीय योग खेळाडू**
**(सुवर्ण पदक विजेत्या)**
**योग शिक्षक**
**प्रा. आ. केंद्र चर्हाटा बीड**
**संचालिका राधिका अँडव्हान्स योग सेंटर बीड**




# नुतन प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुनिलराव केंद्रे यांचा शिक्षकांकडून सत्कार



केज (प्रतिनिधी):- केज गट साधन केंद्रचे नुतन प्रभारी गट शिक्षणाधिकारी म्हणून सुनिलराव केंद्रे यांची पुनर्नियुक्ती झाल्याने गट साधन केंद्र, केज येथे शिक्षकांच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या प्रसंगी गट साधन केंद्र कार्यालयात आयोजित कार्यक्रमात शिक्षक गोकुळ सारूक, सुंदर चौरे, सुनिल नेहरकर, बालासाहेब तांदळे, नामदेव चौरे आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षक बांधवांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन केंद्रे यांचे स्वागत केले. त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा दिल्या. सत्कार स्वीकारताना सुनिलराव केंद्रे यांनी उपस्थित शिक्षकांचे आभार मानले. ते म्हणाले कि, शिक्षक हा समाजातील परिवर्तनाचा खरा वाहक आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांनी एकत्रितपणे काम केल्यास केज तालुका निश्चितच शैक्षणिक क्षेत्रात आदर्श ठरेल.

# बीड येथे विशेष वसुली अधिकारी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन - प्रा. बबनराव आंधळे

बीड (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्य सहकार संघ मर्यादित पुणे अंतर्गत सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर व मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांचे संयुक्त विद्यमाने बीड येथे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँक सहकारी पतसंस्था संचालक कर्मचारी यांच्याकरिता विशेष वसुली अधिकारी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन गुरुवार दिनांक २५ ९ २०२५ ते शनिवार दिनांक २७ ९ २०२५ हे तीन दिवस सदरील प्रशिक्षण बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्य कार्यालय राजुरी वेस बीड येथील सभागृहात आयोजित करण्यात आले आहे या तीन दिवशीय प्रशिक्षणात आर एस बोडके, अकोला, एन एन कुलकर्णी, सोलापूर, आदेश नहार, सीए बीड, एस आर कोळे, उपप्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर, सीए खोडसे, प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड, वरील मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. तरी या प्रशिक्षणाचा बीड जिल्ह्यातील सर्व पतसंस्था नागरी बँका येथील कर्मचारी व संचालक यांनी लाभ घ्यावा पूर्व नोंदणी करून प्रशिक्षणात सहभागी व्हावे असे आव्हान बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे सर यांनी एका प्रसिद्ध पत्रका द्वारे केले आहे .



# धनंजय मुंडे धावले पूरग्रस्तांच्या मदतीला

**परळी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कापसाच्या झाल्या वाती! अनृ शेतकऱ्यांच्या आयुष्याची झाली माती..!!**
**संघर्ष योद्धा मा. कृषिमंत्री आ.धनंजय मुंडे साहेब थर्माकोल च्या होडीमध्ये बसुन थेट पाहाणी करताना**



परळी (प्रतिनिधी):- परळी वैजनाथ तालुक्यातील पोहनेर व परिसरातील गावाना गोदामाईस आलेल्या पुराचा वेढा पडला असून पोहनेरसह काही गांवाचा संर्पक तुटलेला आहे.आज सहकारी व प्रशासनाच्या सोबतीने होडीतून. पोहनेर गावात भेट. ग्रामस्थांशी शंवाद साधत त्याना धीर दिला. प्रशासनासह सर्व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना कोणत्याही परिस्थितीत सामना करण्याच्या दृष्टीने सज्ज राहाण्याच्या सूचना या आधीही केल्या आहेत. बऱ्याच घरामध्ये पुराचे पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत होऊन संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले आहे. अशा कुठुबाना स्थानिक आप्पती निवारण निधीतून तातडीने मदत करण्याबाबत महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचित केले आहे. शेती पिके पूर्ण पाण्यात असून मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी शेतात शिवल्याने जमिनी आढळून गेल्या आहेत तर बहु तास ठिकाणी नदीतील दगड- गोटे सेतात वाहुन आले आहेत. शेतीसह जनसामान्यचे प्रचंड नुकसान झाले आहे. या भीषन परिस्थितीत राज्य सरकार शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्य नागरिकाच्या पाठीशी पान २ वर...



# खा.बजरंग सोनवणे पुरग्रस्तांच्या भेटीला

**मदत मिळवून देण्या साठी प्रयत्न करण्याचा दिला शब्द,शेतकऱ्यांचे पुसले अश्रू,केज, अंबाजोगाई तालुक्यात दिल्या भेटी**

केज (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे.मंगळवारी पहाटे जिल्ह्यातील५७ महसूल मंडळात अतिवृष्टी झालीअसून खा.बजरंग सोनवणे मागील आठ दिवसांपुर्वी झालेल्या अतिवृष्टीची पाहणी करून दिल्लीला गेले होते.यानंतर मागे पुन्हा अतिवृष्टी झाल्याने ते तातडीने मंगळवारी सकाळी बीडला रवाना झाले.यानंतर दुपारी त्यांनी धानोरा,देवळा ता.अंबाजोगाई आणि इस्थळ ता.केज येथे अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली.बीड जिल्ह्यात



दि.१४ सप्टेंबर पासून अतिवृष्टी होत आहे. पहिल्यांदा अतिवृष्टी झाली तेव्हा तातडीने खा.बजरंग सोनवणे यांनी बांधावर जाऊन पिकाची पाहणी केली होती.यानंतर काही दिवसांनी पाऊस थांबला होता.दरम्यान, खा.बजरंग सोनवणे हे दिल्ली येथे जिल्ह्याच्या विकास कामाच्या निमीत्ताने गेले होते. यानंतर बीड जिल्ह्यात पावसाने सुरूवात केली सलग तीन दिवसा पासुन बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झालेली आहे. यामुळे नद्याना महापूर आलेला आहे.या पुरात शेती आणि पिकेही वाहून गेली आहेत. अनेक शेतकऱ्यांचे पशुधनही वाहून गेले असून कोट्यावधी रूपयांचे नुकसान झालेले आहे.मागील काही पान २ वर...

# डॉ योगेश क्षिरसाग सारीका क्षीरसागर पूरग्रस्तांच्या भेटीला


बीड (प्रतिनिधी) बीड विधानसभा मतदारसंघातील हिंगणी खु., चौसाळा, वाढवणा पूल, बोरखेड, शिंदेवस्ती पूल (बोरखेड) आदी गावांमधील पूरग्रस्त भागात मंगळवारी (दि.२३) राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पाहणी केली. याच वेळी डॉ.सारिका क्षीरसागर यांनीही बीड व शिरूर कासार तालुक्यातील काही गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. दाम्पत्याने थेट बांधावर



जाऊन शेतकऱ्यांना धीर दिला.

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेती उभी करणे कठीण झाले आहे. या नुकसानीची माहिती डॉ. क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना सादर केली आहे. आज (दि.२४) अजितदादा पवार यांचा दौरा होण्याची पान २ वर...

**बीड : कागदी वेस बौद्ध नगर बीड या भागात २० ते २५ वर्ष झालेले आहे अद्याप तरीही नाली रस्ता समाज मंदिर सौर ऊर्जा आतापर्यंत कोणतेही काम करण्यात आलेली नाही वारंवार आजी-माजी नगरसेवक आमदार अधिकारी सगळ्यांना निवेदन देऊन तरीही कागदी वेस भागात म्हणजे दलित वस्ती म्हणले की नेत्याच्या पोटात दुखत याकडे कुणाचं लक्ष जात नाही आजूबाजूच्या गल्ल्या रस्त्या बनवून चकाचक झालेले आहे तरी बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार साहेब यांना समाजाच्या वतीने कळकळीची विनंती आहे तुम्ही या कागदी वेस बौद्ध नगर भागामधील काम पूर्ण करून घ्यावे ही अजित दादाला हात जोडून कळकळीची विनंती आहे.**



*बीड जिल्ह्यात ओल्या दुष्काळाचे संकट*

# शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची तात्काळ मदत द्या - बाजीराव ढाकणे यांची सरकारला मागणी

बीड (प्रतिनिधी):- २४ सप्टेंबर २०२५बीड जिल्ह्यात मागील दहा दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, उभ्या पिकांचा पूर्णतः नाश झाला आहे. या पार्श्वभूमीवर महाएनजिओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक तथा सामाजिक कार्यकर्ते श्री बाजीराव ढाकणे यांनी बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी किमान १ लाख रुपयांची तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.



पिकांचे अमाप नुकसान - शेतकरी हवालदिल

श्री बाजीराव ढाकणे यांनी सांगितले की, सोयाबीन, कापूस, मका, तुर, भुईमूग व भाजीपाला यांसारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेती केली होती; पण आता उभे पीक पूर्णपणे पाण्याखाली गेले आहे. शेतकरी हवालदिल झाला आहे. शासनाने अहवाल, पंचनामे व तपासण्यांच्या नावाखाली वेळ पान २ वर...

# सततच्या पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई द्या

**-छावा जिल्हा प्रमुख शिवाजी ठोंबरे**



केज (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.मोठ्या प्रमाणावर शेतपिके पाण्याखाली गेली असून जनावरांचे तसेच घरांच्या नुकसानी मुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे हाल झाले आहेत.या पार्श्वभूमीवर छावा मराठा संघटने कडून आज केज तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात असे नमूद करण्यात आले की, मुसळधार पावसामुळे तालुक्यातील विविध गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. पिकांचे मोठ्या प्रमाणा वर नुकसान झालेअसून शेतकऱ्यांचे हातचे पीक पाण्याखाली गेले आहे. त्याचबरोबर अनेक ठिकाणी जनावरांचा बळी गेला आहे तर घरांचे व वस्तूंचेनुकसान होऊन सामान्य शेतकरी व नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले आहेत.यामुळे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी छावा संघटनेकडून प्रशासनाकडे करण्यात आली.या प्रसंगी छावा मराठा संघटनेचे जिल्हा प्रमुख शिवाजी ठोंबरे, जिल्हा सचिव आसाराम बाबर,दिगंबर तपसे, महादेव धपाटे,भीमराव तपसे आदी पदाधिकारी उपस्थित होते.छावा संघटनेकडून प्रशासनाने तात्काळ शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे ठोस निर्णय घ्यावेत,अन्यथा छावा संघटना तीव्र आंदोलन छेडेल,असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

# जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्या -खा.रजनीताई पाटील

केज (प्रतिनिधी):- मागील पंधरा दिवसा पासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.शेतकऱ्यांची शेती मातीसकट वाहून गेली आहे.जनावरे गुरे वाहून गेली आहेत.बीड जिल्ह्यात ओलादुष्काळ जाहीर करून सरसकट ५० हजार रुपये शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.रजनीताई पाटील यांनी केली आहे.



बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी ५० हजारांची मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सध्या बीड जिल्ह्यात सर्वच तालुक्यात पावसाने मोठे नुकसान झाले असुन सोयाबीन, कापुस पुर्णतः हातातुन गेले आहे.नदीकाठचे घरे,जनावरे वाहुन गेली असुन प्रत्येक गाव या अतिवृष्टीने बाधित झाले आहे कोणतेही पंचनामे न करता जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची अर्थिक मदत तात्काळ द्यावी सद्यस्थितीत जिल्ह्या तील सर्वच नद्या आपले पात्र सोडुन १ ते १.५ कि.मी क्षेत्रातुन वाहत आहेत पान २ वर...

# जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा - सरपंच अंकुश शेळके

शिरुर कासार (प्रतिनिधी)- सध्या बीड जिल्ह्यात झालेल्या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके पाण्याखाली गेली असून कापूस, सोयाबीन, मूग, उडीद, भाजीपाला यांसारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. परिणामी बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी नांदेवालीचे सरपंच अंकुश शेळके यांनी आपल्या सरकारकडे केली आहे. शेतकरी संघटनांसह शेतकरी बांधवांनी राज्य सरकारकडे तात्काळ 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा निकष किंवा अटी न लावता तात्काळ पान २ वर...



# पूरग्रस्तांच्या मदतीला धावून स्वतःचा जीवाची परवा न करता धोक्यात जाऊन सपोनि गोरकनाथ दहिफळेने;मन जिंकल राव तुम्ही

बीड (प्रतिनिधी):- गोदाकाठाच्या पोहनेर गावाचा चहू बाजूंनी संपर्क तुटला ,जनजीवन विस्कळीत झालं ,इथला माणूस संकटात सापडला परंतु ह्या संकटाच्या परिस्थिती एक व्यक्ती दिवस रात्र त्या ठिकाणी उभा होता तो व्यक्ती म्हणजे सिरसाळा पोलीस स्टेशन चे सह पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे साहेब ! नैसर्गिक आपत्तीच्या ह्या काळात आपत्ती ठिकाणी चार दोन पोलीस कर्मचाऱ्यांना आदेश देऊन ते पोलीस ठाण्यात चेअर वर आरामात बसून शकले असते, एखादी चक्कर मारुन फोन वरुनच आढावा घेऊ शकले असते परंतु तसे न करता एक सहकारी सोबत घेऊन संकटात सापडलेल्या गोदाकाठाच्या माणसासाठी धडपडत होते. नेते आले नेते गेले परंतु हि खाकी मात्र पान २ वर...



# स्वातंत्र्यानंतरही मूलभूत सुविधांपासून वंचित

**संतप्त नागरिकांनी तहसीलदाराला पाण्यात उतरवले!**




बीड (प्रतिनिधी):- देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ हून अधिक वर्षे उलटली, तरीही कोठारबन (ता. वडवणी) मधील आंबेडकर नगरकडे जाणारा व गावाला जोडणारा पूल झालेला नाही. अनेक वर्षांपासून ग्रामस्थ सातत्याने रस्ता व पुलाची मागणी करत आहेत, मात्र प्रशासनाकडून कायम दुर्लक्षच होत आले आहे.

अतिवृष्टीमुळे गावाचा संपर्क तुटला अलीकडील अतिवृष्टीमुळे गावाचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. रुग्णांना वेळेत दवाखान्यात नेता पान २ वर...

*बीडकरांसाठी अनिलदादांची हाक; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे नुकसानीचा अहवाल सादर!*

# जिल्हा ओला दुष्काळ घोषित करून तातडीने नुकसानभरपाई द्यावी- अनिलदादा जगताप

बीड (प्रतिनिधी):- - मुसळधार पावसाने बीड जिल्हा अक्षरशः उध्वस्त झाला आहे. दि. १४ ते २३ सप्टेंबर या कालावधीत झालेल्या पूरपरिस्थितीमुळे प्रचंड नुकसान झाले असून त्याची आकडेवारी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी थेट महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांच्यासमोर मांडली असून पूरपरिस्थितीने बीड जिल्ह्याचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी, पीडित नागरिक आणि सर्वसामान्य जनतेसाठी दिलासा मिळावा, यासाठी बीड जिल्हा ओला दुष्काळ घोषित करून तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे केली.



मुसळधार पावसाच्या तडाख्याने सर्वात मोठा फटका शेतीला बसला असून तब्बल ७८ हजार ४५० हेक्टर जिरायत शेती पिकांचे नुकसान झाल्याची नोंद आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्यभराच्या कष्टाच्या जमिनीवर पूर्णतः पाणी फिरल्याने हतबलता वाढली आहे. तसेच जिल्ह्यात ७ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. त्यात आष्टी पान २ वर...

# ओला दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी ५० हजाराची मदत द्या जेष्ठ नेते रमेश आडसकरांचे तहसीलदारांना निवेदन



केज (प्रतिनिधी):- केज तालुक्यात सतत च्या मुसळधार पावसाने सोयाबीन पिकांसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नदी काठ च्या गावातील जमिनी पूर्णपणे पिकांसह खरडून गेल्या आहेत. त्यामुळे शासनाने केज तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे न करता सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी,अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) जेष्ठ नेते रमेश आडसकर यांनी तहसीलदारांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.केज तालुक्यात मागील काही दिवसां पासून सतत मुसळधार पाऊस पडत असून नदी,नाल्यांना पूर येत आहे.शेतात पावसाचे पाणी साचले असून नदीच्या पुराचे पाणी नदी काठच्या गावात आणि शेतात शिरले आहे.त्यामुळे नदीकाठ च्या जमिनी पिकांसह खरडून वाहून गेल्या आहेत.घरांचे नुकसान झाले असून जनावरे ही वाहून गेले आहेत. त्यामुळे पशुधनाची जीवीत हानी झाली आहे.काढणीला पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT